Shri Aillak Pannalal Digamber Jain Pathashala's
# WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY
Seth Walchand Hirachand Marg, Ashok Chowk, Post Box No.634, SOLAPUR – 413006.
Accredited by **NBA,** New Delhi.
Winner of AICTE- CII Survey 2013 & 2014 Award for Best Industry – Linked Institute.
Recognized by **AICTE**, New Delhi and permanently affiliated to **Solapur University, Solapur**
☎ : 2651388, 2652700 • Fax : (0217) 2651538 • Email: principal@witsolapur.org • Website : www.witsolapur.org

विट/एनएसएस/२०१९-२०/४२८ दि. ०५/१०/२०१९

प्रति,
डॉ. गुणवंत सरवदे
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : २ ऑक्टोंबर, महात्मा गांधी जयंती कार्यक्रम अहवाल पाठविणेबाबत..
संदर्भ : १) आपले पत्र जा. क्र. पुअहोसोविसो/रासेयो/२०१९/७५१० दि. ३०/०/०९/२०१९
२) आपले पत्र जा. क्र. पुअहोसोविसो/रासेयो/२०१९/७५०९ दि. ३०/०/०९/२०१९
३) आपले पत्र जा. क्र. पुअहोसोविसो/रासेयो/२०१९/७५४३ दि. ०१/१०/२०१९

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणास कळवू इच्छितो की, आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत मंगळवार दिनांक २ ऑक्टोंबर २०१९ रोजी महात्मा गांधी जयंती जयंती साजरी करण्यात आली तसेच प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती रॅली काढण्यात आली. त्याचा अहवाल सोबत जोडत आहोत.

कृपया याची नोंद घ्यावी.
कळावे.

WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY WIT SOLAPUR

आपला विश्वासू,

(डॉ.एस.ए.हलकुडे)
प्राचार्य

**सोबत** : वरिल प्रमाणे.

लिपीक १०/१०/१९
आवक विभाग
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

# वालचंद इन्स्टिटयूट मध्ये

# महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहाने साजरी

# अहवाल

वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये २ ऑक्टोंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची `अहिंसा` व महात्मा गांधी यांचे `आचार-विचार` याबध्दल भाषणे आयोजित केली होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. मठ एस.एम. यांचे हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थि-विद्यार्थिनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी प्लास्टिक बंदीबाबत व स्वच्छतेची शपथ घेतली.

सत्य, अहिंसा आणि शांतीचा संदेश देणा-या महात्मा गांधीजींचे जीवन अत्यंत पारदर्शी आणि स्वच्छ होते. गांधीजीच्या कोणत्याही कृतीला प्रयत्नांची परिकाष्ठा लाभल्याने त्यांचे विचार प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरते, असे प्रतिपादन कु. प्रियांका डोनाज या विद्यार्थिनीने केले. तसेच सुयोग उपारे या विद्यार्थ्याने पं. लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच त्याने उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. प्रविण काथवटे, श्री. सुनिल जुनवणे, प्रा. सौ. प्रियांका बिडला तसेच प्रा. डॉ. भाग्येश देशमुख, प्रा. विवेक साठे व इतर प्राध्यपक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. या नंतर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये स्वच्छता अभियान हा कार्यक्रम राबविण्यात आला.

प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मानशी वैद्य हिने केले तर पियुषा जुनवणे हीने आभार मानले.

याच बरोबर नॅशनल हायवे अॅथोरिटी ऑफ इंडिया, सोलापूर डिव्हीजन यांनी आयोजित केलेल्या स्वच्छता जनजागृती रॅली मध्ये सहभागी होऊन प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करण्याबद्दलचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. सदरहू रॅली जुना पुना नाका, रेल्वे स्टेशन मार्गे सात रस्ता पर्यंत काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी रस्त्यावर पडलेले प्लास्टिक तसेच कचरा गोळा केला. या रॅलीत सिव्हील इंजिनिअरिंग विभागातील प्रा. सचिन देशमुख आणि महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. पृथ्वीराज तांबे, प्रा. महेश महंत, प्रा. चंद्रकांत राठोड, प्रा. सौ. सुप्रिया पसनूर तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY W.I.T SOLAPUR